# चिपळूण नगर परिषद

## निविदा सुचना

(बांधकाम विभाग/योजना)

चिपळूण नगर परिषद खालील कामांसाठी बी-१ टक्केवारी पध्दतीने व दोन लखोटा पध्दतीने सीलबंद निविदा योग्य वर्गातील महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम डीडी अथवा मुदत ठेव स्वरूपात | सुरक्षा अनामत | | ठेकेदाराचा वर्ग | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत (ना-परतावा) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करारनामा सोबत | बीलातून | | | |
| १ | वॉ.क्र. ४ कराड रोड पूर्व विभाग सोसायटी ते राहूल गार्डन पर्यंतच्या रस्त्यास कारपेट व सिलकोट करणे. | ६,५४,४५५/- | १०,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ४५ दिवस | १,०००/- |
| २ | चिपळूण नगर परिषद हद्दीतील शंकरवाडी येथील मुख्यरस्त्यावर पवार फॉर्म हाऊसजवळ स्लॅब मोरी बांधणे. | ३,१०,८२५/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| ३ | वॉ.क्र.१९ मध्ये रॉयल नगर येथे अंतर्गत रोडलगत सी.सी. गटार बांधणे. | ५,३०,२१४/- | १०,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ४५ दिवस | १,०००/- |
| ४ | वॉ.क्र.८ वाणीआळी येथे वैभव खेडेकर घरापासून उर्दु शाळेपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूची आ.सी.सी. गटार बांधणे. | ३,६३,६७८/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| ५ | वॉ.क्र.१४ मध्ये गोवळकोट येथे श्री. आत्माराम शिंदे यांचे घरापासून मुख्यरस्त्यापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे. | ६,६७,७१०/- | १०,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ७५ दिवस | १,०००/- |
| ६ | वॉ.क्र.३ मार्कंडी येथील नाटुस्कर घर ते सार्व.संडासपर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | ४,२५,६३३/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| ७ | बहादुरशेख येथे मिनाताई ठाकरे उद्यानास लॉन व पेविंग ब्लॉक बसविणे. | २,४०,७४०/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-८ व त्यावरील | ४५ दिवस | ५,००/- |
| ८ | वॉ.क्र.१२ गोवळकोट येथील अविनाश कदम ते गोवळकोट मुख्यरस्त्यापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | ३,०८,६५५/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| ९ | गोवळकोट धक्का या परिसरामध्ये श्री. शरीफ नेवरेकर गॅरेजपासून रिक्शा स्टॉप पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | ३,६६,१८१/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| १० | बहादूरशेख मोहल्ला येथील इब्राहिम जाफर वांगडे घर ते अली कुंडलीक घरापर्यंत आर. सी .सी. गटार बांधणे. | ४,१६,५३५/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | ओझरवाडी भागातील किरण विहार संकुल ते हायवेपर्यंत रस्ता खडीकरण करणे व या रस्त्यालगत गटार बांधणे. | ३,२६,२२५/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-८ व त्यावरील | ९० दिवस | ५,००/- |
| १२ | वॉ.क्र.६ स्वामी नारायण अपार्टमेंट (श्रीराज इलेक्ट्रीकल) ते अनंत गार्डन पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | २,५५,९२०/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-८ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| १३ | बहादुरशेख नाका येथे पुरातन काळातील घोडेबावचे सुशोभिकरण करणे. | २,७७,८२२/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-८ व त्यावरील | ९० दिवस | ५,००/- |
| १४ | पाग झरी येथे कळकवणेरोडचे डांबरीकरण करणे व त्या रोड लगत गटार बांधणे. | ४,१९,६५०/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-७ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |
| १५ | विठ्ठल मंदिर ते शिंदे घरापर्यंत पाखाडीवर पेविंग ब्लॉक बसविणे. | २,६४,६७५/- | ५,०००/- | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-८ व त्यावरील | ६० दिवस | ५,००/- |

१. निविदा फॉर्म मिळण्याची शेवटची तारीख ०५/०३/२००९ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
२. निविदा सादर करण्याची अंतीम तारीख ०७/०३/२००९ वेळ दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.
३. निविदा उघडण्याची अंतीम तारीख ०७/०३/२००९ वेळ सायंकाळी ४.३० वाजता चिपळूण नगर परिषद कार्यालयामध्ये उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत येतील. उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. कामासंबधी नकाशे अंदाजपत्रक व माहिती नगर परिषद बांधकाम विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत. किंवा नगर परिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल. कोणतेही सर्व अथवा एक निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अंतिम अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवणेत येत आहेत.

निविदा सुचना क्रमांक ०९०२७२
दिनांक : २५/०२/२००९

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

# सविस्तर निविदा सुचना

१. बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान १ वर्षे मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.

२. निविदा फॉर्म लेखा विभागात आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध
होतील.

३. यशस्वी ठेकेदार यांनी करारनाम्यासोबत अनामत रक्कम भरली नाही अथवा करारनामा विहीत मुदतीत केला नाही तर भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. करारनामा पूर्ण झाल्यावर यशस्वी ठेकेदारांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणून वर्ग होईल.

४. निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत न भरल्यास बयाणा रक्कम जप्त होईल. निविदा उघडल्यापासून १२० दिवसांत नगर परिषदेने काहीही न कळविल्यास निविदा धारकाला निविदा मागे घेता येईल व अशा वेळी बयाणा रक्कम परत मिळेल. निविदा दिनांकापासून १२० दिवसापर्यत वैध राहील.

५. अयशस्वी निविदा धारकांना निविदा नामंजूर झाल्याचे कळविल्यानंतर किंवा १२० दिवसांनंतर अर्ज केल्यानंतर अर्ज केल्यावर बयाणा रक्कम परत देण्यात येईल.

६. निविदा स्विकृतीबाबत ठेकेदार यांना पत्राने कळविण्यात येईल.

७. निविदा धारकांनी पान क्रमांक ४ वर कामाची निविदा या ठिकाणी टक्केवारीने कमी/जादा लिहून व अक्षरी लिहून सही करणे आवश्यक आहे. अक्षरी व अंकी यामध्ये फरक आढळल्यास दोन्हीमधील सर्वात कमी दर स्विकृत करण्यात येईल.

८. निविदेमध्ये कोणतेही पान वाढविता अथवा कमी करता येणार नाही.

९. निविदा सादर करण्याची पध्दत

९.१ निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.

९.२ निविदा लखोटा क्र.१ मध्ये बयाणा रक्कमेचे डी.डी/मुदत ठेव पावती, तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारे कागदपत्र आवश्यक आहेत. केलेल्या कामाचे अनुभवाचे दाखले या कागदपत्रांची यादी व सर्व कागदपत्र सत्यप्रती लिपी (साक्षांकित) करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणत्याही अटी शर्ती टाकावयाच्या असल्यास लखोटा क्र.१ मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

९.३ ठेकेदार यांचे योग्य वर्गातील नोंदणीपत्र सत्यप्रती लिपी (साक्षांकित) केलेले व स्वच्छ दिसणारे आवश्यक आहे.

९.४ कुशल व तांत्रिक कर्मचारी यांची यादी लखोटा नंबर १ मध्ये स्वतःच्या सहीने ठेवणे आवश्यक आहे.

९.५ भागीदारी फर्म असल्यास भागीदारी पत्राची सत्यप्रती लिपी व अधिकार पत्र जोडणे आवश्यक आहे.

९.६ दोन्ही लखोट्यावर कामाचे नाव ठेकेदाराचे नांव लिहून दोन्ही लखोटे सिलबंद करून लखोटा क्रमांक ३ मध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे.

९.७ आयकर पॅनकार्डच्या सत्यप्रती लिपी व वॅट रजिस्ट्रेशनचा दाखल्याची सत्यप्रत लिपी सोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. निविदा उघडणे

१०.१ निविदा उघडणेसाठी नेमलेल्या दिवशी प्रथम लखोटा क्रमांक १ उपस्थित ठेकेदारासमोर उघडणेत येईल. व त्यामध्ये कागदपत्रांची छाननी मुख्याधिकारी किंवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी करतील. व उपस्थित ठेकेदार यांचे आक्षेप यासंबधी खात्री करतील.

१०.२ दुसरे दराचा सिलबंद लखाटा लखोटा क्र.१ मधील कागदपत्रे योग्य असल्याबद्दल मुख्याधिकारी अथवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांची खात्री पटल्यानंतरच उघडण्यात येईल.

१०.३ निविदा लखोटा क्र. १ मधील कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्यास लखोटा क्र. २ उघडण्यात येणार नाही. व तो निविदा धारकांला परत मिळणार नाही.

१०.४ निविदा धारकांने निविदेच्या संपूर्ण अटी व शर्ती वाचल्या असल्याबद्दल व त्या मान्य असल्याबद्दल प्रत्येक पानावर सही करणे आवश्यक आहे. तसेच कामाचे नकाशे अंदाजपत्रक पाहिले असलेबद्दल निविदेतील प्रतिज्ञापत्रावर सही करणे आवश्यक आहे.

१०.५ कामाचे बाबतीत किंवा कागदपत्राचे बाबतीत कोणताही बदल आवश्यक असल्यास त्याबाबत निविदा फॉर्म खरेदी करणारे ठेकेदार यांना पत्राने तसेच वर्तमान पत्रात त्याबाबत आवश्यक ती शुध्दीपत्रक निविदा सादर करण्याच्या दिवसापूर्वी प्रसिध्द करणेत येईल.

१०.६ निविदेसंबधी कोणतेही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास ते निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये देणे आवश्यक आहे. मुख्याधिकारी यांचेवर कोणत्याही अटीची निविदा किंवा बेकायदेशिर अटी स्विकृत करण्याचे बंधन नाही.

११. यशस्वी निविदा धारकांना निविदा मंजूरीनंतर योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

१२. मंजूर निविदा धारकांना निविदा मंजूरीबाबत कळविल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत रोखीने अथवा मुदत ठेवीने न भरल्यास निविदा अमान्य करून फेर निविदा अथवा अन्य निविदाधारकांची निविदा स्विकृत करावी लागल्यास फरकाची रक्कम संबधीत

ठेकेदाराकडून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५१ अन्वये वसुल पात्र असेल.

१३. कोणतेही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतेही कारणे देण्यात येणार नाहीत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद